cmyk
• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २७७ • शनिवार,दि. ६ जानेवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 277 • Saturday 6 Janewari 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3



दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

महाराष्ट्रात तालुकानिहाय फिरणार

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

महाराष्ट्र अडचणीत आहे. राज्या समोर सर्वात मोठी अडचण असणार आहे ते म्हणजे पाण्याची. त्यामुळे आपण पाण्यासाठी प्रयत्न करायचेत. अंगणवाडी सेविकांना शब्द देते की, आमचं सरकार आलं की पहिली सही अंगणवाडी सेविकांच्या प्रश्नाच्या फाईलवर करेन, असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी सरकारवर हल्लाबोल केला. शिर्डीमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून पदाधिकाऱ्यांच्या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाषणादरम्यान सुप्रिया सुळे यांनी अनेक मुद्द्यांना हात घातला. मराठा, धनगर, लिंगायत आरक्षणाचा मुद्दा जो सोडवेल त्याच्या पाठिशी आम्ही ताकदीने उभे राहू. देवेंद्र फडणवीस आमच्या घराबाहेर येऊन बोलत होते की, आम्ही आरक्षण देऊ, असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांनाही टोलाही लगावला. जो गरीब आहे त्याच्या विरोधात नाही, तर दिल्लीच्या अदृश्य शक्तीविरोधात मी लढेन, असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी भाजपला टोला लगवला.

सुप्रिया सुळे, अजित पवार यांना सॉफ्ट लँडिंग होतं. पण शरद पवारांना ते कधीचं नव्हतं. ते स्वत:च्या हिंमतीवर मुख्यमंत्री झाले. मी पक्षाकडे आजपर्यंत काहीह मागितलं नाही केवळ खासदारकीचं तिकीट मागितलं. यशवंतराव चव्हाण यांचं नाव पुढे घेऊन मी जाईन. समोरच्य लोकांना तो अधिकार नाही. केवळ एक दिवस जाऊन फुले वाहण्यात काही अर्थ नसतो. नातं तोडण सोप्प असतं ते निभावता येणं जमायला हवं, असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी अजित पवारांना टोला लगावला.

५० खोक्यावर जर आमदार विकला जात असेल तर त्या आमदाराला लाज वाटालयला हवी. मी आमदारकी लढणार नाही.माझा नवरा कॉन्ट्रॅक्टर नाही त्यामुळं मला भिती वाटत नाही. माझ्या वडिलांची लढाई नाही ही महाराष्ट्राचा स्वाभिमानाची लढाई आहे.आमच्यात वाद लावून तुम्ही निवूडन येणारं हे चालणार नाही, असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं.

संपूर्ण राज्यात तालुकानिहाय फिरणार

सगळी बक्षिसं कशी मिळतात कारण आम्ही सभागृहात बसतो.मी उच्च शिक्षित आहे, करायची असती तर नोकरी केली असती. शनिवार रविवार सुट्टी घेतली असती. पण माझ्यावर ते संस्कार झालेत, घरातील कर्त्या पुरुषाच्या पाठी उभं राहायचं. काहीजण याचा गैरफायदा घेतात. लोकसभा निवडणूक लढवणारच त्यानंतर चार महिने संपूर्ण राज्यात तालुका निहाय दौरा करणार असल्याची घोषणा देखील सुप्रिया सुळे यांनी यावेळी केलीये.

जिजाऊ जन्मोत्सव, सिंदखेडराजा येथे व्यवस्थेसाठी ४५० स्वयंसेवक

जालना । वृत्तसंस्था

राजमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त जिजाऊ सृष्टी सिंदखेड राजा येथे दरवर्षी विविध उपक्रम राबवले जातात. १२ जानेवारी रोजी देशभरातून लाखोंच्या संख्येने जिजाऊप्रेमी, शिवप्रेमी येतात असतात. यामुळे या दिवशी वाहतुकीची समस्या निर्माण होते. यामुळे सुरक्षा रक्षक समिती करण्यात येत आहे. सिंदखेडराजा येथील वाहतूक व्यवस्थेसाठी जिल्ह्यातून ४५० स्वयंसेवक सेवा देणार आहेत. १२ जानेवारी रोजी सिंदखेडराजा येथील जिजाऊ सृष्टी येथे मोठ्या प्रमाणात सामाजिक, सांस्कृतिक आदी विविध कार्यक्रम होतात. सिंदखेडराजा ते बाहेर सात किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागतात. यामुळे वाहतूक व्यवस्थेचे नियोजनासाठी ४५० स्वयंसेवक जात आहेत. या उपक्रमासाठी गजानन भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली रोहीत देशमुख, शुभम टेकाळे, योगेश वनारसे, शुभम शिंदे, सुरेश तळेकर, माऊली उढाण, अनिल मदन यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. १२ जानेवारी रोजी जालना जिल्ह्यातूनही अनेक जण जात असतात. प्रत्येक जण आपल्या वाहनासोबत भगवा झेंडा घेऊन जात असतो. अनेक ठिकाणी अन्नदानही वाटप होते. जालन्याचे स्वयंसेवक ही कामे करणार स्वयंसेवक सांस्कृतिक कार्यक्रमांवर देखरेख, येणाऱ्यांना काही अडीअडचणी आल्यास, कुठे वाहतूक खोळंबली तर त्या अनुषंगाने हे स्वयंसेवक कामे करणार आहेत. जालना ते सिंदखेडराजा, जिजाऊसृष्टीपर्यंतच्या विविध ठिकाणी या समन्वयकांची उपस्थिती असणार आहे.

बीड : नगर परिषदचे माजी सभापती नवनाथ शिराळे, कालिदास गव्हाणे यांनी शिवसेना जिल्हा मध्यवर्ती कार्यालय बार्शी रोड बीड येथे सदिच्छा भेट असता शिवसेना जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते व यानी सत्कार केला.

रश्मी शुक्ला यांची पोलीस महासंचालक पदावरील नियमबाह्य नियुक्ती रद्द करा

मुंबई । वृत्तसंस्था

महाराष्ट्र पोलीस महासंचालकपदी वरिष्ठ अधिकारी रश्मी शुक्ला यांची नियुक्ती राज्य सरकारकडून करण्यात आली आहे. मात्र केंद्रीय आयोगाच्या निकर्षानुसार रश्मी शुक्ला यांची नियुक्ती करण्यात आली नाही, त्यामुळे ही नियमबाह्य नियुक्ती रद्द करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या विद्या चव्हाण यांनी मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेमध्ये केली. विद्या चव्हाण म्हणाल्या की, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नियमाप्रमाणे कुठल्याही अधिकाऱ्यांची नियुक्ती करताना अधिकारी किमान सहा महिने पेक्षा अधिक निवृत्तीचा कार्यकाळ असणे आवश्यक असते मात्र नवनिर्वाचित पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांचा निवृत्तीचा कार्यकाळ पाच महिन्यांवर असताना त्यांची पोलीस महासंचालक पदी नियुक्ती कशी काय करण्यात आली आहे असा प्रश्न यावेळी विद्यालय चव्हाण यांनी उपस्थित केला आहे केंद्रीय निवडणूक आयोगाच्या नियमा विरोधात ही ▶▶ पान २ वर

सहकारी पक्षांना सोबत घेऊन लढणार

नगर । वृत्तसंस्था

मोदी सरकारला हटविण्यासाठी ठरावीक कार्यक्रम इंडिया आघाडीच्या माध्यमातून राबवावे लागणार आहेत. वाढती बेरोजगारी, महागाई, आर्थिक विषमता, खासगीकरण असे मुद्दे घेऊन योग्य असे धोरण ठरविले जाणार आहे. एकट्याने नाही, तर सहकारी पक्षांना सोबत घेऊन येणाऱ्या निवडणुकांना सामोरे जायचे आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या 'ज्योत निष्ठेची, लोकशाहीच्या संरक्षणाची' या दोन दिवसांच्या शिबिराचा गुरुवारी शिर्डीत समारोप झाला. त्यावेळी पवार बोलत होते. महाराष्ट्रातील आव्हानांचा अभ्यास केला असता जनमानसातून पर्याय दिला पाहिजे, यावर आमचे मत पक्के झाले आहे. नक्कीच त्यास जनतेचा पाठिंबा मिळेल. त्या

कामासाठी तुम्ही तयार राहा, असे आवाहनही त्यांनी केले. ते पुढे म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेला महत्त्व देण्याचे काम देशात सुरू आहे. हिंदुत्वावर आधारित फॅसिझम त्यांना आणायचा आहे. त्यासाठी त्यांनी पाच कलमी कार्यक्रम हातात घेतला आहे. खासगीकरण, नफेखोरीला प्रोत्साहन, मुस्लीम समाजाविरुद्ध द्वेष वाढवणे, स्वायत्त संस्थांवर कब्जा ठेवणे, मनुवादी वर्चस्ववाद वाढविणे, पाकिस्तानविरोधी आक्रमकता दाखविणे, अशा मुद्यांतून भारतीय जनता पक्ष जनतेसमोर वेगळे वातावरण तयार करीत आहे, असेही शरद पवार म्हणाले. खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, सेवा, सन्मान व स्वाभिमान ही त्रिसूत्री घेऊन आपण जनतेसमोर जाणार आहोत. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी रामाच्या मुद्यात अडकू नका, जनतेचे प्रश्न सोडवा, सरकारच्या उणिवा जनतेसमोर आणा, असे आवाहन केले. वंचित बहुजन आघाडीला सोबत घेणार. वंचित बहुजन आघाडीशी आमची चर्चा सुरू आहे. प्रकाश आंबेडकर यांनाही आपण इंडियामध्ये सामील करून घेऊ, असेही शरद पवार यांनी भाषणात स्पष्ट केले.

मराठीतील आद्यसंपादक होण्याचा बहुमान जांभेकरांना

आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी मुंबई येथे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या इंग्रजी आणि मराठी भाषेतील पाक्षिकाची सुरूवात करून मराठी वृत्तपत्राची

मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या या कार्यामुळे मराठीतील आद्यसंपादक होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. आज या घटनेस १८६ वर्षे पूर्ण झाली. त्यांच्या या महत कार्याची आठवण आपणास रहावी म्हणून प्रतिवर्षी ६ जानेवारी रोजी राज्यात दर्पण दिन साजरा केला जातो. त्या निमित्त हा लेख. वृत्तपत्रांचा इतिहास हा जनतेचा आणि चळवळींचा इतिहास असतो. वृत्तपत्रे सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देतात. त्याद्वारे लोकांना सामाजिक संकेत, कार्यात्मक भूमिका आणि मूल्य याबाबतचे शिक्षण दिले जाते, असे सुप्रसिध्द माध्यमतज्ज्ञ ए.ए.बेर्जर यांनी म्हटले आहे. त्यानुसार आचार्य जांभेकरांनी केवळ लोककल्याण आणि लोकशिक्षण असाच उदात्त हेतू नजरेसमोर ठेऊन 'दर्पण' प्रकाशित केले. १८३२ चा काळ, अर्थातच इंग्रजांच्या अधिपत्याचा काळ होता. राष्ट्रभक्तीसाठी समाजास प्रबोधनाची मोठी गरज होती. इंग्रजांच्या हातात आपले राष्ट्र असताना आपल्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करुन, परिस्थितीची जाणीव करुन देण्यासाठी एखादे वृत्तपत्र असावे, असे बाळशास्त्रींना वाटले आणि त्यांनी दर्पण सुरु केले. 'दर्पण'मध्ये एकही जाहिरात त्यांनी छापली नाही. अगदी स्वत:चे पैसे टाकून जवळपास आठ वर्षे लोकांसाठी वृत्तपत्र सुरु ठेवले. भाऊ महाजन यांच्या सहकार्याने मराठी तर स्वत: इंग्रजी मजकूराची बाजू ते 'दर्पण'साठी सांभाळत. त्यामुळे 'दर्पण' मधील मजकूराचा दर्जा उच्च होता. त्याकाळी सुरु झालेल्या मुद्रणालयाचा यथार्थ उपयोग त्यांनी करून घेतला आणि दर्पणरुपी ज्योत समाजप्रबोधनासाठी तेवत ठेवली. दर्पणच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण व मनोरंजन यांचा समन्वय साधला. दर्पण हे इंग्रजी विद्येचा मराठी सार सांगणारे ठरले. २५ जून १८४० साली दर्पणचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. आचार्य बाळशास्त्री जांभेकरांबद्दल न्यायमूर्ती ना.ग.चंदावरकर यांनी म्हटले आहे की, बाळशास्त्री अव्वल इंग्रजी अंमलातील ▶▶ पान २ वर

आदित्य ठाकरेंचा एकनाथ शिंदेंवर आरोप

मुख्यमंत्री शिंदेच्या सहमतीने २२६ एकर जमीन बळकावण्याचा डाव!

मुंबई । वृत्तसंस्था

युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी महालक्ष्मी रेसकोर्स येथील जागेबाबत अतिशय धक्कादायक आणि खळबळजनक आरोप केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत २२६ एकर खुल्या जागेची आभासी विक्री आणि जमीन बळकावण्यास सहमती दर्शविली आहे, असा खळबळजनक आरोप आदित्य ठाकरे यांनी दिली. आदित्य ठाकरे म्हणाले की, रेसकोर्सची जमीन राज्य सरकारच्या जवळील बिल्डरकडून हडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. रेसकोर्सच्या जागेसंदर्भात ६ डिसेंबर २०२३ ला सकाळी ११ वाजता बैठक घेण्यात आली, ज्यामध्ये चार रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब व्यवस्थापन ४ वरिष्ठ अधिकार्यांसह मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला महापालिका आयुक्तही उपस्थित होते. या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काही निकषांवर २२६ एकर खुल्या जागेची आभासी विक्री आणि जमीन बळकावण्यास सहमती दर्शविली आहे, असा खळबळजनक आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत गंभीर आरोप केला. ९१ एकर आरडब्ल्यूआयटीसीकडे (व्यवस्थापनाकडे) ठेवली जाईल आणि उर्वरित बीएमसी विकासासाठी स्वतःच्या ताब्यात घेईल. ठथखढउ साठी ३० वर्षांच्या लीज करारावर स्वाक्षरी केली जाईल. या प्रस्तावाला सहमती ▶▶ पान २ वर

cmyk

संपादकीय

हॉर्न ओके प्लीज!

इंडियन पीनल कोड या इंग्रजांनी केलेल्या दंड विधानाच्या जागी आलेल्या भारत न्याय संहितेच्या निषेधार्थ देशातील ट्रकचालक तीन दिवसांच्या संपावर गेले आहेत. आजचा तिसरा दिवस आहे. या नव्या न्याय संहितेत 'हिट अँड रन' म्हणजे अपघात झाल्यानंतर पळून जाणाऱ्या ट्रकचालकांना जास्तीत जास्त दहा वर्षांचा तुरुंगवास आणि सात लाख रुपयांपर्यंतचा दंड अशी तरतूद केली आहे. ही तरतूद जाचक असल्याचे या संपाचे नेतृत्व करणाऱ्या 'ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेस' या संघटनेने म्हटले आहे. ही संघटना स्वातंत्र्यापूर्वीच म्हणजे १९३६ सालीच स्थापन झाली आहे. देशातले ९३ लाख ट्रक, ट्रॉली, टेम्पोधारक या संघटनेच्या परिघात येतात. तसेच, ५० लाख बस आणि टुरिस्ट गाड्यांचे चालकही या संघटनेशी जोडलेले आहेत. या संघटनेने आपण स्वतंत्र आहोत आणि राजकीय अजेंडा नाही, असे म्हटले असले तरी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि नेते राहुल गांधी यांनी या संपाचे समर्थन करून ट्रकचालकांना पाठिंबा दिला आहे. भारतात दरवर्षी सुमारे पाच लाख छोटे-मोठे अपघात होतात. एक लाख ७० हजारांहून अधिक प्राण जातात आणि पाच लाखांहून अधिक नागरिक किरकोळ, गंभीर जखमी होतात किंवा जन्माचे जायबंदी होतात. या साऱ्या अपघातांमध्ये ट्रक, बस, ट्रॉली, टेम्पो, टँकर्स, मोठी वाहने यांचे प्रमाण २५ टक्क्यांच्या आसपास असावे आणि पुष्कळदा असे अपघात हे जीवघेणे होण्याची शक्यता असते. अशी सगळी पार्श्वभूमी असली तरी केंद्र सरकारने ट्रकचालक संपावर जाईपर्यंत बोलणी का केली नाहीत, असा प्रश्न येतोच. सगळे नवे कायदे स्वाभाविकच गृह खात्याच्या अखत्यारीत येत असल्यामुळे सध्या केंद्रीय गृह सचिव संपकरी संघटनांशी चर्चा करीत आहेत. मात्र, या कायद्यात नेमकी काय दुरुस्ती करायला हवी आणि रस्त्यांवर होणाऱ्या लाखो अपघातांची जबाबदारी नेमकी कुणी घ्यायची, याचा सोक्षमोक्ष लागणे अपेक्षित आहे. कोणताही अपघात झाला की नेहेमी मोठ्या वाहनांना जबाबदार धरले जाते, असे संपकऱ्यांचे नेतृत्व करणाऱ्या मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसने म्हटले आहे. ते बऱ्याच प्रमाणात खरे आहे. अनेकदा झोप आल्याने किंवा मद्यधुंद अवस्थेत छोटी वाहने, गाड्याही ट्रकसारख्या अवाढव्य वाहनांवर मागून किंवा समोरून जाऊन आदळतात. अशा अपघातांमध्ये ट्रक चालकांचा काहीच दोष नसतो. अशावेळी, भारतात कोणताही अपघात झाला की शेकडोंच्या संख्येने जमणाऱ्या 'पब्लिक'ने किंवा पोलिसांनी ट्रक चालकांना संरक्षण द्यायला हवे. अनेकदा तसे होत नाही. मारहाण केली जाते. म्हणूनच मोठे अपघात झाल्यावर ट्रकचालक आधी पळून जातात. जखमी तसेच पडून राहतात. यात आपल्या समाजाचा आणि पोलिसांचाही दोष होता. मात्र, अशा अपघातांची माहिती दिल्यास किंवा मदत केल्यास चालकांना लक्ष्य केले जाणार नाही आणि त्यांच्यामागे कायद्याचा ससेमिराही लागणार नाही, असे आश्वासन केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिले होते. त्यांच्या या संघटनांशी अनौपचारिक संवाद असेल तर हा संप होण्याआधी त्यांच्याकडेच या प्रकरणातून मार्ग काढण्याची जबाबदारी गृह खात्याने सोपवायला हवी होती. तत्त्वतः हा नव्या कठोर कायद्याचा मुद्दा गृह खात्याच्या अखत्यारीत येत असला तरी हा सारा विषय वाहतूक खात्याशी संबंधित आहे. सरकारच्या दोन्ही नियंत्यांना हे समजतच नसेल, असे नाही. या संपामुळे गावोगावी जो हाहाकार उडाला, पेट्रोलसाठी रांगा लागल्या, इंधन संपल्याचे फलक लागले, लगेच बाजारात भाव चढू लागले, अनेक ठिकाणी वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या... हे सारे भारतीयांच्या स्वभावाला धरूनच झाले. काहीही झाले की समाजाने 'पॅनिक' व्हायचे आणि मग त्याचा जास्तीत जास्त लाभ उठविण्यासाठी काहींनी कंबर कसायची, ही आपली समाजरीतच आहे. तसेच सध्या चालले आहे. देशातील ७० टक्क्यांहून अधिक मालवाहतूक ट्रक करीत असल्याने आणि लक्षावधी ट्रक दरवर्षी कोट्यवधी मैल प्रवास करीत असल्याने या संपाने देशभरात गडबड उडून जाणे, स्वाभाविकच आहे. देशातल्या वाढत्या अपघातांना वाहन चालकांचे आरोग्य, दृष्टी, त्यांची व्यसने, वाहनांचे आरोग्य, ट्रकमध्ये भरला जाणारा अतिरिक्त माल, नियमांची ऐशीतैशी, प्रवासात नसणारी आरामाची सुविधा, चालकांच्या केबिनमधील गैरसोयी.. अशी असंख्य कारणे आहेत. हजारो चालक महिनोनमहिने घरी जात नाहीत. 'ए मालिक क्यू बनाया गाडी बनाने वाले को, घर से बेघर बना कर दिया गाडी चलाने वाले को...' हे अनेक ट्रकमागे वचन ही वेदनाच दाखवते. तेव्हा हा सगळा प्रश्न केवळ कडक कायद्याचा धाक दाखवून सुटणारा नाही. सध्या सुरू असलेल्या संपाबाबत 'हॉर्न ओके प्लीज' ही सूचना ना संपकऱ्यांनी मनावर घेतली; ना केंद्र सरकारने मनावर घेतली. त्यामुळे, सारा देश आज विस्कळित झाल्यासारखा दिसतो आहे.

राज्यात २७ हजार सहकारी संस्थांच्या निवडणुका वर्षभरात

पुणे । वृत्तसंस्था

नव्या वर्षात निवडणुकीस पात्र असलेल्या ५ हजार ५४८ सहकारी संस्था तसेच आतापर्यंत पुढे ढकलण्यात आलेल्या सुमारे २२ हजार संस्था अशा एकूण २७ हजार सहकारी संस्थांच्या निवडणुका येत्या वर्षभरात करण्याचे आदेश राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. जगदीश पाटील यांनी दिले आहेत. निवडणूक प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली असून, प्रारूप मतदारयादी अर्हता दिनांकापासून करण्याचा आदेशही त्यांनी दिला आहे. सहकारी संस्था, प्रशासकीय मंडळ नियुक्त सहकारी संस्था, हंगामी समितीचा कालावधी संपुष्टात आलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. त्यानुसार राज्यातील 'ब' वर्गातील २८०, 'क' वर्गातील एक हजार ९६० आणि 'ड' वर्गातील तीन हजार २९४ अशा एकूण पाच हजार ५४८ सहकारी संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. ज्या संस्थांच्या कार्यप्रणालीवरून न्यायालयात प्रकरणे प्रलंबित आहेत किंवा निकाल लागेपर्यंत निवडणुका घेऊ नये, असे स्पष्ट आदेश दिले असल्यास किंवा सक्षम प्राधिकाऱ्यांनी विशेष आदेश दिले असल्यास संबंधित संस्थांच्या निवडणुका घेण्यात येणार नाहीत, असेही पाटील यांनी स्पष्ट केले आहे. डॉ. पाटील म्हणाले, राज्यातील ९० हजार संस्थांपैकी सुमारे ४८ हजार संस्थांच्या निवडणुका गेल्या चार वर्षांत पूर्ण करण्यात आल्या आहेत. तर विदर्भ व मराठवाड्यातील सुमारे १२ हजार विविध कार्यकारी संस्थांना निधीअभावी निवडणुका घेणे शक्य नव्हते. या संस्थांना अवसायनात काढून त्यांना राज्य सहकारी बँकेकडून ३ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. या संस्था जिल्हा बँकेशी संबंधित असून या निधीतून या संस्थांच्या निवडणुका घेण्याचे ठरले आहे. तसेच कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर अनेक सहकारी संस्थांच्या निवडणुका लांबल्या होत्या. तसेच काही अडचणी, न्यायालयीन प्रक्रियेमुळेही सहकारी संस्थांच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. ही संख्या सुमारे २२ हजार इतकी आहे. तर यंदा ५ हजार ५४८ सहकारी संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यामध्ये अ वर्गातील सहकारी संस्थांसाठी १५०, ब वर्ग संस्थांसाठी १२०, क वर्ग संस्थांसाठी ६० आणि ड वर्ग संस्थांसाठी ६० दिवस अगोदर मुदत देऊन निवडणूक घेण्यात येतील. ज्या सहकारी संस्थांच्या निवडणुका तोंडावर आल्या आहेत किंवा मुदत संपण्यास काही दिवसांचा कालावधी बाकी आहे, अशा संस्थांची मतदारयादी तयार करण्यासाठीचा अर्हता दिनांक संचालक मंडळाची मुदत संपली, त्या दिवशीची ग्राह्य धरली जाणार आहे. प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करता येत नसलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी नव्याने प्रारूप मतदारयादी तयार करण्यात येणार असून, अर्हता दिनांकाबाबतचे प्रस्ताव स्पष्टीकरणासह प्राधिकरणासमोर सादर करण्याचा आदेशही देण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बीड-नगर-परळी रेल्वे मार्गाचे स्वप्न आता पुर्णत्वास, बीडच्या आणखीजवळ आली रेल्वे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा वासियांच्या जिव्हाळ्याच्या विषय असलेल्या बीड-नगर-परळी रेल्वेबाबत आणखी एक आनंदाची बातमी पुढे आली आहे. नगर ते आष्टी या मार्गानंतर आता आष्टी ते अंमळनेर या तीस किलोमीटरच्या मार्गाचे काम देखील पूर्ण झाले आहे. या मार्गावर ताशी ११० किमी वेगाने रेल्वेची हायस्पीड चाचणी यशस्वी झाली. यामुळे आता बीडच्या आणखी जवळ रेल्वे आली आहे. आष्टी ते अंमळनेर या ३० किलोमीटरच्या मार्गावर ११० किलोमीटर प्रति तास या वेगाने हायस्पीड चाचणी यशस्वी झाली. रेल्वे दाखल झाल्याने अंमळनेरकरांनी आनंद व्यक्त केला. रेल्वे पाहण्याचे स्वप्न पूर्ण झाल्याने अनेकांनी बोगीत बसून फोटो काढले. रेल्वे पाहण्यासाठी अंमळनेरसह परिसरातील ग्रामस्थांनी स्टेशनवर मोठी गर्दी केली होती. आता येथून बीडचे अंतर ७० किमीच राहिले असल्याने जिल्हावासीयांमध्ये आनंद पसरला

आहे. दरम्यान, अंमळनेर रेल्वे स्थानकावर रेल्वे पाहण्यासाठी लोकांची वाढती गर्दी पाहता व त्या ठिकाणी काही अनूसुचित प्रकार ,घटना घडू नये म्हणून अंमळनेर पोलीस ठाण्याचे ठाणे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांचे बारकाईने लक्ष होते. रेल्वेमुळे अंमळनेरचे नाव आता देशाच्या पर्यटन मार्गावर आल्याने वैभवात भरच पडल्याच्या भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

पान १ वरून....

मुख्यमंत्री शिंदेच्या सहमतीने

देण्यासाठी इतर घोडे मालकांना प्रभावित करण्यासाठी बीएमसी रेसकोर्सवरील तबेले पुनर्बांधणीसाठी जवळपास १०० कोटी खर्च करेल. जिथे व्यवस्थापनाने खर्च करायला हवा तिथे आमच्या करदात्यांच्या १०० कोटींचा वापर का केला जातोय?, असा सवाल आदित्य ठाकरेंनी केला. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबत कोणतीही स्पष्टता न देता चर्चा केली आहे. ठथखढउ च्या या २-३ सदस्यांनी पालिका आयुक्तांना वार्षिक सर्वसाधारण सभेत बाकीच्या सदस्यांना प्रेझेंटेशन देण्यास सांगितले आहे, जेणेकरून समितीला इतरांवर प्रभाव पाडण्यास मदत होईल. आरडब्ल्यूआयटीसी/एआरसीच्या प्रत्येक सदस्याला सरकारच्या या जमीन हडप प्रस्तावाची माहिती होती का? असा सवाल आदित्य ठाकरेंनी केलाय. वरळी रेसकोर्स/मुंबईच्या मोकळ्या जागेवर या उघड विक्रीसाठी या अधिकृत बैठकीपूर्वी गुप्त बैठका झालेल्या या समिती सदस्यांना सदस्यांनी माहिती दिली आहे का? लीज करार संपला असेल आणि ठथखढउ उर्वरित जमीन सोडण्यास तयार असेल, तर ते अर्बन फॉरेस्ट/क्रीडांगण म्हणून आरक्षित केले जाऊ शकते. मात्र मुंबईच्या या मोकळ्या जागेवर आम्ही त्यांना एक वीटही रचू देणार नाही. २-३ व्यक्ती मुंबईतील जमीन 'बिल्डर-कंत्राटदार सरकारला' देऊ शकत नाहीत. आम्ही मुंबईकर प्रत्येक स्तरावर यासाठी लढा देऊ आणि ही जमीन हडप होऊ देणार नाही, अशी भूमिका आदित्य ठाकरे यांनी मांडली.

मराठीतील आद्यसंपादक

एक थोर विद्वान तसेच ज्ञानाच्या विविध क्षेत्रात लीलया संचार करणारे पंडित होते. न्यायमुर्तीचे उपरोक्त विधान बाळशास्त्रींच्या शैक्षणिक कार्याचे संक्षिप्त वर्णन आहे. तर आचार्य अत्रे यांनी बाळशास्त्री जांभेकरांबद्दल खूपच महत्त्वपूर्ण अशी टिपणी केली आहे. ते लिहितात की, बाळशास्त्री जांभेकर हे बोलके नव्हे तर कर्तेसुधारक होते. केवळ प्राध्यापक म्हणून अध्ययनच न करता बाळशास्त्रींनी आपल्या दर्पण मधून सामाजिक सुधारणेवर भर दिला. दादाभाई नौरोजी हे आचार्य बाळशास्त्रींचे विद्यार्थी होते. केवळ दर्पण वृत्तपत्राची निर्मितीच नव्हे तर समाजसुधारणेचे कार्यही बाळशास्त्री जांभेकरांनी केले. किंबहुना सामाजिक सुधारणेच्या बाबतीत ते आग्रही होते. समाज सुधारला तरच राजकीय स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होईल असे त्यांचे मत. सार्वजनिक जीवनात विचारमंथन करण्यासाठी वर्तमानपत्रासारखी मोठी शक्ती आहे. तिचा उपयोग समाजात बदलासाठी होऊ शकतो. याचा त्यांना अभ्यास होता. त्यामुळेच बाळशास्त्रींनी तत्कालीन चुकीच्या रुढी परंपरांवर प्रहार केला. धार्मिक व सामाजिक सुधारणांबाबत बाळशास्त्री जांभेकर हे प्रगमनशील व्यवहारवादी होते. म्हणूनच त्यांनी दर्पणला समाज परिवर्तनाचे शास्त्र व शस्त्र म्हणून वापरले. वयाच्या अकराव्या वर्षी संस्कृतचे शिक्षण पूर्ण करुन जांभेकरांनी मुंबई गाठली होती. मुंबईत इंग्रजी भाषेचा सखोल अभ्यास करुन त्यांनी विविध विषयांचे ज्ञान मिळविले. या ज्ञानाचा उपयोग आपल्या समाजाला कसा होईल याकडे त्यांचा ओढा होता. तत्कालीन प्रमुख ८ भाषा व अनेक शास्त्रात ते पारंगत होते. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी समाजसुधारणा, शिक्षण आणि वृत्तपत्र प्रसार यासाठी केलेले कार्य हे अलौकिक असे आहे. त्यांच्या या कार्याचा सन्मान म्हणून मुंबईचे तत्कालीन गर्व्हनर सर जेम्स कॉर्नोक यांनी १८४० साली जस्टीस ऑफ पीस अशी पदवी देऊन बाळशास्त्रींचा गौरव केला. आज वर्तमानपत्राची भव्यता पाहता झालेली प्रगती लक्षात येते. परंतु त्याकाळी अत्यंत बिकट स्थितीतमध्ये वर्तमानपत्र चालविण्याचे कार्य आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी केले. आद्य मराठी पत्रकार, आद्य समाजासुधारक आणि आद्य प्रपाठक म्हणून आचार्य बाळशास्त्री जांभेकर ओळखले जातात. भारतातील पहिले प्रोफेसर म्हणजे प्रपाठक होण्याचा बहुमान १८३४ साली बाळशास्त्रींना मिळाला पुढे ते १८४५ साली ते शिक्षण विभागाचे संचालक झाले. त्यांनी विविध विषयांवर ग्रंथ लिहिले. यात प्रामुख्याने भूगोल, इतिहास, भौतिकशास्त्र, गणित, खगोलविद्या, मानसशास्त्र आदी विषयांचा समावेश आहे. सोप्या आणि साध्या मराठी भाषेत सर्वांना समजतील, असे हे ग्रंथ आहेत. याच बरोबर त्यांनी बालव्याकरण, भूगोलविद्या, सारसंग्रह आणि नीतीकथा हे चारग्रंथ लिहिले आहेत. एलिफिन्स्टनकृत हिंदुस्थानांच्या आधारे त्यांनी इतिहास रचला. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास हा ग्रंथ १८५१ साली त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध झाला.

रश्मी शुक्ला यांची पोलीस

नियुक्ती करण्यात आली असल्याने तत्काळ त्यांची निवड रद्द करण्यात यावी अशी मागणी देखील विद्या चव्हाण यांनी केली. पुढे त्या म्हणाल्या की, रश्मी शुक्ला यांच्यावर फोन टॅपिंग प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला होता. विद्यमान उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळच्या अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे महाविकास आघाडीची सरकार असताना त्यावेळी अनेक नेत्यांचे फोन टॅपिंग रश्मी शुक्ला यांनी केला होता या आरोपामधून अद्यापही त्या निर्दोष सुटलेल्या नाही आहे तरी देखील त्यांची राज्यातील अतिशय महत्त्वाच्या असलेल्या पोलीस महासंचालक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. रश्मी शुक्ला यांनी सातत्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधातील नेत्यांविरोधात कार्य केले आहे फोन टॅपिंग प्रकरणा त रश्मी शुक्ला यांच्यावर कारवाई होण्याचे संकेत मिळतात केंद्रातील भाजप सरकारने रश्मी शुक्ला यांची केंद्रात प्रति नियुक्ती करण्यात आली होती नंतर महाराष्ट्रातून महाविकास आघाडी सरकार पाडल्यानंतर पुन्हा एकदा त्यांना राज्यात वापस आणण्यात आले आहे.असेही विद्या चव्हाण यांनी म्हटले आहे. रश्मी शुक्ला यांची नियुक्ती आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून करण्यात आली आहे. या दोन्ही निवडणुकांमध्ये आपल्याला पोलीस प्रशासनाचा उपयोग करण्यात यावा याकरिता हे नियुक्ती देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. निवडणुकीमध्ये पोलीस प्रशासनाची कामगिरी अतिशय महत्त्वाची असते. त्यामुळेच रश्मी शुक्ला असतील तर त्यांना जे हवं ते करता येईल म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, असा आरोपही त्यांनी केला.

पान ४ वरून...

बनावट कागदपत्रांच्या

महामंडळानेही कर्ज देतांना कर्जदाराने जर कर्जाची परतफेड केली नाही तर त्यासाठी आवश्यक असलेले दोन सरकारी नौकर जामीनदार द्यावे लागतील अशी अट घालण्यात आली. याअटीनुसार सचिन चोधे यांनी अनिल सुर्यभान काळे, विजय शामराव गायकवाड हे दोन सरकारी नौकर आहेत आणि ते बीड येथील ग्रामीण पाणी पुरवठा विभागात शासकीय नौकरीला आहेत त्याअनुषंगाने कर्जदाराने जर कर्जाची परतफेड केली नाही तर ती परतफेड सरकारी नौकर या नात्याने आमच्या पगारातून करण्यात यावी असे हमीपत्रही दिले. २००९ ते २०१८ या कालावधीपर्यंत कर्जदार सचिन चोधे यांनी कर्जाची परतफेड केली नाही आणि जामीनदार ही कर्जफेडीसाठी प्रतिसाद देत नाहीत. यामुळे २०१८ साली ओबीसी महामंडळाने जिल्हा न्यायालयात कर्ज प्रकरणाच्या वसुलीसाठी रितसर केस दाखल केली. त्याअनुषंगाने २० डिसेंबर रोजी या प्रकरणामध्ये न्यायालयाने निकाल दिल्याच्या अनुषंगाने कर्जदार सचिन रामदास चोधे बनावट सरकारी जामीनदार अनिल सुर्यभान काळे आणि विजय शामराव गायकवाड या तिघांवर ओबीसी महामंडळ जिल्हा व्यवस्थापक सोन्याबापु रावसाहेब गुट्टे यांच्या फिर्यादीवरून शिवाजी नगर पोलिस ठाण्यातमध्ये वरील तिन्ही आरोपी विरोधात भादंवी कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन या प्रकरणाचा तपास पो.उप.नि. जाधव हे करीत आहेत.

मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने

मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागाचे समन्वयक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत जिल्हा प्रसिद्धी प्रमुख संजय हंगे ,जिल्हा उपाध्यक्ष रवी उबाळे,तालुका समन्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका निमंत्रक मंगेशनिटुरकर, तालुका अध्यक्ष दत्ता आजबे कार्याध्यक्ष शेख रेहान कोषाध्यक्ष प्रशांत लहुरीकर, सरचिटणीस चंद्रकांत साळुंके , उपाध्यक्ष दत्ता नरनाळे ,अनिल अष्टपुत्रे यांनी केले आहे.

जात प्रमाणपत्र पडताळणी

राहील. तथापि विद्यार्थी /पालक विहित कालमर्यादेत समितीकडे अर्ज सादर न केल्याने व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशावेळी विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना जातवैधता प्रमाणपत्र मिळविताना विविध अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच विहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास विद्यार्थ्यांना प्रवेशापासुन वंचित लागु नये म्हणून बीड जिल्हातील सर्व संबंधित महाविद्यालयांनी व इयत्ता ११ वी १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थी / सीईटी देणारे / डिप्लोमा तृतीय वर्ष विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावीत, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांचेकडून करण्यात येत आहे.

कथा प्रबोधनाची चळवळ

संस्कारांची रुजवण करणारा आहे.याप्रसंगी संचालक डॉ.सचिन देशमुख, के.व्ही.गाजरे यांचीही समयोचित भाषणे झाली.अध्यक्षीय समारोप प्रसंगी एस.आर.शर्मा म्हणाले की,कथामलेतून परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवण्याचे कार्य केले जाते. कार्यक्रमाचा प्रारंभ पूज्य साने गुरुजी,महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी खरा तो एकचि धर्म ही साने गुरुजींची प्रार्थना धनंजय जाडे यांनी सादर केली तर कार्यक्रमाचे गीत जे.यु.झाम्बरे यांनी गायले. कार्यक्रमाचे प्रास्तावित ए.बी.सोळंके यांनी सूत्रसंचालन जी.आर.राठोर तर आभार ग.वा. मुळाटे यांनी मानले.कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह पालकांची मोठी उपस्थिती होती.

विद्यार्थ्यास रॉडने

झाल्याने त्याच्यावर बीड जिल्हा रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. सदरील हा मारहाणीचा प्रकार कुठल्या कारणावरून घडला हे मात्र समजू शकले नाही. या प्रकरणाचा पुढील तपास पिंपळनेर पोलीस करत आहेत.

अनिल जगताप करणार

म्हणाले की,२००९ ला उमेदवारी जाहीर झाली पण रात्रीतून काय झालं माहीत नाही माझी उमेदवारी कापण्यात आली.सातत्याने अन्याय करण्यात आला. रात्रंदिवस काम करत असताना अचानक पद काढण्यात आल.त्यावेळी हसावं की रडावं असा प्रश्न पडला. पद गेल्यावर अनेकांना फोन केले पण कोणीच उत्तर दिलं नाही.येणाऱ्या विधानसभा निवडणूक साठी मी कामाला लागलो असताना माझ्यावर अन्याय केला. शिवसेनेत अंधार सेनेचे वर्चस्व वाढले आहे.गाठूड्याचे व्यवहार झाले.

जाहिर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण
अर्ज नं. २/२०२३
भानुदास पि. दगडू राठोड विरूध्द ग्रा.पं. कार्यालय, म्हाळसापूर
१. भानुदास पि. दगडू राठोड, रा.म्हाळसापूर, ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत झिमाबाई भ्र. भानुदास राठोड यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंद वहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यास मृत्यू यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास म्हाळसापूर, ता.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला घेवून मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे म्हाळसापूर, ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला घेवून मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३१/१२/२०२३ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १/०२/२०२४ ही आहे.

स्वाक्षरीत/-
तहसिलदार,बीड

जाहिर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण
अर्ज नं. ९/२०२३
शेख रईस नन्नुमिया विरूध्द न.प.बीड
१. शेख रईस नन्नुमिया रा. गांधीनगर, बीड यांचा प्रस्ताव दिनांक २२/११/२०२३

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत शेख नन्नुमिया शेख बंडू यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंद वहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यास मृत्यू यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास बीड, ता.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला घेवून मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यू नोंद न.प.बीड, ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला घेवून मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३१/१२/२०२३ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १/०२/२०२४ ही आहे.

स्वाक्षरीत/-
तहसिलदार,बीड

जाहिर प्रगटन

मा.श्री.संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज १९/२०२४

अर्जदार :- १) रेखा रामराव जगदाळे, वय ६६ वर्षे, धंदा घरकाम, रा. वैतागवाडी, ता.जि.बीड, ह.मु. शासकीय दुध योजना, परंडा, ता.परंडा, जि.उस्मानाबाद, २) अमोल रामराव जगदाळे, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३) गजीराबाई बाबुराव जगदाळे, वय ८२ वर्षे, धंदा घरकाम, रा. वैतागवाडी, ता.जि.बीड.

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी नामे रामराव बाबुराव जगदाळे हे दि. ०८/११/२०२३ रोजी वैतागवाडी, ता.जि.बीड येथे मयत असून अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र. ३ ही मयताची आई आहे.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांना हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/०१/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीख १५/०२/२०२४
क.लिपीक

कोर्टाचा शिक्का

मार्फत
ॲड.एस.बी.शिंदे

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

महत्त्वाचे वृत्त..

सोमेश्वर पब्लिक इंग्लिश स्कूल येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

बीड : बीड येथील सोमेश्वर पब्लिक इंग्लिश स्कूल मध्ये दिनांक ३ जानेवारी बुधवार रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आहे. यावेळी संस्थेचे सचिव आगाम मी, प्राचार्य जाधव सर व शिक्षक पालक शिक्षकेतर कर्मचारी आदींच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. या दिनाचे औचित्य साधून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषा विद्यार्थ्यांनी परिधान करून साजरी केली. यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणेहीं सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोंडे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन लांब सर यांनी केले.

विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

बीड : तालुक्यातील आहेर चिंचोली येथे २४ जानेवारी रोजी श्री नारायण माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये स्व. प्रा. संतोषजी महादेवराव काळे यांचे पुण्यस्मरणार्थ विविध स्पर्धा घेऊन बक्षीस वितरण करण्यात आले. चित्रकला स्पर्धा ,रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले . अध्यक्षस्थानी माननीय श्री विजयसिंह पंडित साहेब(माजी जिल्हा परिषद अध्यक्ष) होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माननीय श्री शिवाजी मोटे संचालक , मा.प्रल्हादराव झिरपे, मा. डॉ बाळासाहेब पिंगळे (संपादक लोकतंत्र), मा. महादेवरावजी तुपे, श्री सुमंत काळे पाटील, श्री रावसाहेब रकटे, तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा, संस्थेचे सचिव अमोल काळे सर, सौ. राजश्री काळे पिंगळे मॅडम, सरपंच कैलास निर्मळ, श्री विकास रकटे सरपंच, श्री अशोकराव पांढरे साहेब, इंजिनीयर बाळासाहेब लोणकर, .कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य विनायक ढास सर यांनी केले तर भारदार असे सूत्रसंचालन करपे सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन चव्हाण सर यांनी मानले.

महाराष्ट्र शिक्षणसंस्था महामंडळाची कडक भूमिका

नागपूर : राज्यातील शिक्षणसंस्था चालकांचे प्रश्न दहा वर्षांपासून प्रलंबित आहे. मात्र त्याकडे सरकारचे कमालीचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप महाराष्ट्र शिक्षणसंस्था महामंडळाचे कार्यवाह रवींद्र फडणवीस यांनी केला. येत्या फेब्रुवारीत होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी इमारती व कर्मचारी देणार नसल्याचा इशारा फडणवीस यांनी दिला आहे. सरकार आमच्या मागण्यांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे. सरकारला अनुदानीत शिक्षणसंस्थांचे कंबरडे मोडायचे आहे. शालेय आणि उच्चशिक्षातून आपला हात बाहेर काढायचा आहे. राईट टु एज्युकेशन' बरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचाही अधिकार मुलांना आहे. परंतु त्याकडे शासन पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे. त्यासाठी लागणारी आर्थिक मदत वारंवार सांगूनही उपलब्ध करून देत नाहीत. बारा वर्षांपासून ७० हजार शिक्षकांच्या जागा रिक्त आहे. अतिरिक्त शिक्षकांचा मोठा प्रश्न अजूनही सुटलेला नाही असे फडणवीस यांनी सांगितले. शिक्षणमंत्री शिक्षक भरतीच्या रोज नव्या तारख्या जाहीर करतात. पण अजूनही प्रक्रिया सुरू झालेली नाही. वेतनेतर अनुदान अजून दिलेले नाही. अडिच हजार कोटींचे वेतनेतर अनुदान देय असतानाही २६८ कोटींच्यावर देण्यास तयार नाहीत. एक बैठक शालेय शिक्षणमंत्र्यांसोबत झाली होती. पण त्यातून तोडगा निघाला नाही. सध्या न्यायालयात दाद मागितली आहे. मुख्यमंत्र्यांनाही पत्र दिलेले आहे. सरकारचा नकारात्मक दृष्टीकोन आहे असे आरोप फडणवीस यांनी केले. सरकार आम्ही चोर आहोत असे वागतात. सरकारने जबरदस्तीने इमारती अधिगृहीत करण्याचा प्रयत्न केला तर न्यायालयीन लढा देऊ असा इशारा फडणवीस यांनी दिला.

जितेंद्र आव्हाडांना जीवे मारण्याच्या धमक्या

मुंबई : राम (ठरा) हा शाकाहारी नव्हता तर मांसाहारी होता, असे वक्तव्य करणाऱ्या शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर जोरदार टीका होत आहे. असे असतानाच आता त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या मिळत असल्याची माहिती शरद पवार गटाचे ओबीसी सेलचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राज राजपूरकर यांनी दिली आहे. आव्हाड साहेबांनी केलेल्या वक्तव्यानंतर राज्यात त्यांच्याबद्दल टीका टिप्पणी केली जात असून, त्यांना जीवे मारण्याची धमक्या सुरु झाल्या असल्याचे राजपूरकर म्हणाले आहेत. दरम्यान यावर बोलतांना राज राजपूरकर म्हणाले की, आव्हाड यांनी केलेलं वक्तव्य त्यांच्या वाचनातून अभ्यासपुर्व केलेलं आहे. सुधीर फडके, ग.दी. माडगूळकर यांच्या गीत रामायनातून गायलेल्या काव्यामधून सर्व संदर्भ मिळतो. शंभर दीडशे वर्षांपूर्वी या रामायनातील कविता गायल्या गेल्या आहेत. राम हे क्षत्रिय होते, शिकार तर ते करणारच, रामायनात देखील उल्लेख आहे. कानपुरच्या विद्यार्थ्यांनी रामायणाचा अभ्यास करुन माहिती काढली त्यातून देखील ही माहिती समोर आली आहे. वाल्मिकी यांनी केलेल्या रामायनात संदर्भ आहे. तो तुम्हाला मान्य नाही का?, असा प्रश्न राज राजपूरकर यांनी उपस्थित केला.

मराठवाड्यात २० वर्षांत अॅट्रॉसिटीच्या १३२६६ पैकी ४१८ गुन्ह्यांतच शिक्षा

परभणी । वृत्तसंस्था

मराठवाड्यात २० वर्षांत दाखल झालेल्याअॅट्रॉसिटीच्या १३२६६ प्रकरणांतील ४१८ गुन्ह्यांमध्येचआरोपींना शिक्षा झाली असून शिक्षेचे प्रमाण अवघेतीन टक्के आहे. कधी फिर्यादी व साक्षीदार फितूरहोणे तर काही प्रकरणांत सबळ पुरावा

नसल्यानेशिक्षेची टक्केवारी कमी आहे. सर्वात जास्त नांदेड जिल्ह्यात २१४० तरत्यापाठोपाठ परभणी २०४२, बीड २००४, छत्रपतीसंभाजीनगर १५६७, जालना १६२१, लातूर १५३७,धाराशिव १२८९, हिंगोली जिल्ह्यात १०६६ गुन्हे दाखलझाले आहेत. अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधककायद्यांतर्गत अनेक प्रकरणात गुन्हे दाखलझाल्यानंतर काही दिवसांत गावपातळीवरप्रकरणे सामोपचाराने मिटवली जातात. त्याचापरिणाम न्यायालयात होणाऱ्या साक्षीपुराव्यावरहोतो. त्यामुळे गुन्हेगार निर्दोष सुटतात.गावपातळीवर वाद मिटवण्याचे प्रयत्न होतअसल्याने शिक्षेचे प्रमाण कमी झाले असावे,असे वकील सुनील भुक्तार यांनी सांगितले.

४५१ किलो गांजा नष्ट

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

अंमली पदार्थ नाश समितीकडून ४५९ किलो गांजा गुरुवारी ४ जानेवारी रोजी नष्ट करण्यात आला. जिल्हा पोलिस अधीक्षक सुनिल कडासने यांच्या आदेशाने जिल्हा स्तरावर एक ड्रग्ज डिस्पोजल कमिटी स्थापन केली होती. या कमिटीत अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, अपर पोलिस अधीक्षक बी.बी महामुनी,पोलिस उपअधीक्षक मुख्यालय, जयवंत सातव, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक अशोक लांडे हे होते. ड्रग्ज डिस्पोजल कमिटीच्या उपस्थितीत नगर परिषद येथील दोन सरकारी पंच, शासकीय फोटोग्राफर अनिल चित्ते यांच्या समक्ष येथील एमआयडीसीमधील वॉईस इकोकेअर आणि फॅर्मटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत १०० डिग्री सेल्सीअस तापमानात कंपनीचे मॅनेजर सचिन अनिल हवालदार यांच्या समक्ष हा गांजा गुरुवारी ४ जानेवारी रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास नष्ट केला गांजा जाळल्यानंतर त्याची राख नष्ट करण्यासाठी पावर इनव्हायरो लिमिटेड, बुटीबोरी, नागपूर या सामाईक घातक घन कचरा केंद्रात नष्ट करण्यासाठी पाठवणार आहे, असे सचिन हवालदार यांनी सांगीतले. हा गांजा जिल्ह्यातील लोणार, बिबी, शिवाजी नगर, पिंपळगाव राजा, जळगाव जामोद, सोनाळा, हिवरखेड, साखरखेर्डा अशा वेगवेगळ्या पोलिस ठाण्यातील ११ गुन्हयातील एकूण ४५९ किलो गांजा होता. गांजा नष्ट करण्यासाठी न्यायालयाचे आदेश, इतर परवानगी घेवून समिती समोर व्हिडीओ, फोटोग्राफी करून नष्ट केला. या वेळी अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, अपर पोलिस अधीक्षक बी.बी महामुनी, पोलिस उपअधीक्षक जयवंत सातव, स्थागुशाचे अशोक लांडे, सहायक पोलिस निरीक्षक नीलेश सोळंके, एएसआय रामविजय राजपूत, दीपक लेकुरवाळे, अमोल शेजोड, जयंत बोचे, मनोज खेडे, सुभाष वाघमारे, अनिल चित्ते उपस्थित होते, अशी माहिती स्थागुशाचे पोलिस निरीक्षक अशोक लांडे यांनी दिली.

वैजापूर पोलिसांच्या पेट्रोलिंग वाहनाला अपघात

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

वैजापूर पोलिसांची गस्तीवरील शासकीय जीपला गुरुवारी पहाटे३.१५ वाजता अपघात झाला. अज्ञात वाहनाने जीपला हुलकावणी दिल्यामुळे, राष्ट्रीय महामार्ग ७५२एच मधील जरुळ शिवारात ही दुर्घटना झाली. अपघातात पोलिस निरीक्षक शामसुंदर कौठाळे, पोलिस कर्मचारी ज्ञानेश्वर मेटे व चालक भिवाजी कुऱ्हाडे हे तिघे जण जखमी झाले. त्यांच्यावर वैजापूरयेथील रुग्णालयात उपचार सुरुआहेत. या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार तिघे पोलिस शासकीय वाहनाने (एम.एच.२०जी. के.१४९७) गस्त घालत होते. उपविभागीय गस्त करुन खंडाळ्याहून वैजापूरकडे येतानापहाटे, समोरुन भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने पोलिसांच्या जीपला हुलकावणी दिली. त्यामुळे चालक कुऱ्हाडे यांचेवाहनावरील नियंत्रण सुटले. जीपरस्त्याच्या डाव्या बाजूला खड्डयातजाऊन दगडावर आदळली. याप्रकरणी अज्ञात वाहनचालकावरगुन्हा दाखल करण्यात आला.

संभाजीनगरमधील २५० एकर जमिनीच्या खरेदी-विक्रीत ५०० कोटींचा गैरव्यवहार? महसूल मंत्र्यांचे चौकशीचे आदेश

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

तालुक्यातील अब्दिमंडी येथील गट क्र.११, १२, २६, ३७ व ४२ मधील २५० एकर जमिनीच्या फेरफार नोंदीमध्ये ५०० कोटींच्या गैरव्यवहाराच्या चर्चेने जिल्हा प्रशासन ढवळून निघाले आहे. या प्रकरणात महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जमाबंदी आयुक्तांना चौकशीचे आदेश दिले आहेत. दिवाळीपासून या प्रकरणाची चर्चा महसूल वर्तुळात सुरू आहे. महसूल मंत्र्यांच्या चौकशीच्या आदेशामुळे सगळ्या यंत्रणेचे धाबे दणाणले आहेत. दसरा- दिवाळीच्या सुट्यांमध्येच त्या जमिनीच्या सुनावण्या, फेरफार आणि विक्रीचे व्यवहार करण्यात आले आहेत. महसूल शाखेच्या टेबलवर एका अव्वल कारकुनने 'उत्तम'रीत्या संचिका हाताळली. यात काही तलाठ्यांची विशेष नियुक्ती केल्याची चर्चा आहे. महसूल शाखेतील अव्वल कारकून, विधी विभागातील अधिकाऱ्यांनी दिवाळीच्या सुटीत याप्रकरणी परिश्रम घेतल्याचे बोलले जात आहे. तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार, दुय्यम निबंधक यांच्यासह महसूल, मुद्रांक विभागातील यंत्रणा या प्रकरणात संशयाच्या भोवऱ्यात सापडली असून, चौकशीअंतीच सत्य-असत्य समोर येईल. गट क्र.११, १२, २६, ३७ व ४२ मधील २५० एकर जमीन ही एका व्यक्तीची मिळकत आहे. परंतु, महसूल रेकॉर्डला ई.पी.सरकार (ईव्हॅक्यू/ निर्वासित मालमत्ता) नमूद आहे का? जमीन मालकाच्या अपिलावर जिल्हाधिकाऱ्यांनी १७ ऑक्टोबर



२०२३ रोजी निर्णय देत ई.पी.सरकारऐवजी जमीन मालकीची असल्याचे नोंद घेण्याचे आदेश दिले. मात्र, अप्पर तहसीलदारांनी जिल्हाधिकाऱ्यांनी पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करता त्रयस्थ व्यक्तीच्या नावे महसूल अभिलेखात नोंदी केली आहे का? तसेच त्या जमिनीचा ८ नोव्हेंबर २०२३ रोजी फेरफार घेत त्रयस्थांच्या नावे विक्री पत्रही झाले. मूळ मालक बाजूला ठेवून हा सगळा प्रकार झाला असून, २५० एकर जमिनीत ५०० कोटींचा गैरव्यवहार झाल्याचा संशय आहे. यात दोषींवर शासन काय कारवाई करणार? असे प्रश्न आ.सतीश चव्हाण यांनी हिवाळी अधिवेशनात लक्षवेधीतून उपस्थित केले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी न्यायालयाच्या निर्णयानुसार आदेश पारित केले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानुसार त्या जमिनीच्या अभिलेखावर ई.पी सरकार अशी असलेली नोंद, त्याबाबतची याचिका, न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अभिलेखात बदल झाले आहेत काय, याची खात्री करण्यासाठी जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख यांनी सखोल तपासणी करून शासनाला अहवाल सादर करावा, असे आदेश महसूल मंत्री विखे यांनी दिले आहेत. चौकशी व सुनावणीदरम्यानच्या पुराव्यांआधारे तहसीलदारांनी नोव्हेंबर २०२३ मध्ये ८ जणांची नावे जमिनीच्या फेरफारमध्ये घेतली. त्या आधारे ८ जणांनी अग्रवाल कुटुंबीयांना ही जमीन तातडीने विक्री केली. त्या खरेदी-विक्री व्यवहाराला दिवाणी न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले आहे. तसेच विभागीय आयुक्तांकडे देखील जिल्हा प्रशासनाने दिलेल्या आदेशाला आव्हान दिलेले आहे. दरम्यान मुद्रांक विभागाने तातडीने खरेदी-विक्रीचे व्यवहार केल्याने सगळी साखळी यात गुंतल्याचे दिसते आहे.

शेतकरी हितासाठी वाईन उद्योगास प्रोत्साहन योजना

योजना पाच वर्षांसाठी राबविण्याचा निर्णय

मुंबई । वृत्तसंस्था

राज्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी वाईन उद्योगास प्रोत्साहन देणारी योजना पाच वर्षांसाठी राबविण्याचा निर्णय गुरुवारी मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. कोविडच्या काळात २०२०-२१ मध्ये ही योजना बंद करण्यात आली होती. या योजनेत २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या आर्थिक वर्षात उद्योजकांनी व्हॅटचा भरणा केला आहे. त्यापैकी १६ टक्केप्रमाणे उद्योगांना व्हॅटचा परतावा दिला जाईल. सुका मेवा तसेच पर्यायी उत्पादनांची निर्मिती करण्यासाठी या योजनेत तरतूद करण्यात आली आहे.

नांदेड-बिदर नवीन ब्रॉडगेज प्रकल्पाला वेग देण्यासाठी राज्य शासनाच्या हिश्श्याच्या ७५० कोटींस मान्यता मंत्रिमंडळाने दिली. या मार्गासाठी जमिनीच्या किमतीसह १५०० कोटी ९८ लाख इतका खर्च येणार आहे. विदर्भातील सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी वैनगंगा-नळगंगा प्रकल्पास पाणी उपलब्धता अट शिथिल करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. गोसीखुर्द प्रकल्पातील पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पूर्णा, तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्ह्यातील नळगंगा प्रकल्पापर्यंत वळविले जाणार आहे. विदर्भातील ६ जिल्ह्यांतील ३ लाख ७१ हजार हेक्टर क्षेत्र सिंचित होणार आहे. मंत्रालयीन लिपिक-टंकलेखकांना दरमहा पाच हजार रुपये ठोक भत्ता देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी ११ कोटी एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली. सध्या मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांमध्ये लिपिक-टंकलेखकांची संख्या १,८९१ इतकी असून त्यांना याचा लाभ मिळेल. - केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र ही योजना २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात आली. - महारेशीम अभियान राबवून तुती लागवड करणाऱ्या व टसर रेशीम उद्योग करू इच्छिणाऱ्यांना याचा फायदा होईल. सहकारी संस्थांच्या अधिकाऱ्यांविरुद्ध आता अविश्वास प्रस्तावाचा कालावधी वाढविण्यात आला असून २ वर्षांच्या आत असा प्रस्ताव आणता येणार नाही, अशी सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. सध्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात अविश्वासाचा प्रस्ताव ६ महिन्यांच्या आत सादर केला जाणार नाही, अशी तरतूद आहे; हा कालावधीअत्यल्प असल्याने हा निर्णय घेण्यात आला.

सात दिवसांत पूर्ण करणार मराठा समाजाचे सर्वेक्षण

मुंबई । वृत्तसंस्था

मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध करण्यासाठी राज्य सरकार युद्धपातळीवर कामाला लागले असून, राज्यभरात दोन लाखांहून अधिक प्रगणक सर्वेक्षणाद्वारे माहिती गोळा करून सात दिवसांत अहवाल देणार आहेत. यासाठी त्यांना हॅण्डहेल्ड डिव्हाइस दिले जाणार आहे. हे प्रगणक जिल्हा, तालुका, गावपातळीवर फिरून यासंदर्भातील माहिती गोळा करून अहवाल देणार आहेत. मराठा आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात २४ जानेवारीला सुनावणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर सरकारकडूनही पावले उचलली जात आहेत. मराठ्यांचे आर्थिक व सामाजिक मागासलेपण सिद्ध करण्यासाठी आवश्यक माहिती लागणार आहे. ती गोळा करण्यासाठी प्रगणक नेमण्यात येणार आहेत. या प्रगणकांना वेगाने प्रशिक्षण देण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व आयुक्त, महापालिका यांच्याकडून मास्टर ट्रेनर्स नियुक्त केले जाणार आहेत. मोठ्या जिल्ह्यांकरिता दोनपेक्षा अधिक मास्टर ट्रेनर्स नियुक्त केले जातील. प्रगणकांत वाढ करण्याची मुभा जिल्हाधिकाऱ्यांना दिली आहे. जानेवारीच्या अखेरच्या आठवड्यात सर्वेक्षण पूर्ण होऊन मागासवर्ग आयोगाचा अहवाल येण्याची शक्यता आहे. त्यानंतर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यातच विशेष अधिवेशन घेतले जाईल. त्यात मराठा आरक्षणाचा प्रस्ताव मान्यतेसाठी आणला जाईल. राज्य मागासवर्ग आयोगाने सर्वेक्षणासाठी प्रश्नावली अंतिम केली आहे. या प्रश्नावली सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व महानगरपालिकांना पाठविण्यात आलेली आहे. यासाठी गोखले इन्स्टिट्यूट, पुणे या संस्थेकडून सर्वेक्षण कामकाजासाठीचे सॉफ्टवेअर तयार करण्यात येत असून, हे सॉफ्टवेअर युजर फ्रेंडली असेल. हे सॉफ्टवेअर हॅण्डहेल्ड डिव्हाइसमध्ये असेल. यातील प्रश्नावलीनुसार सर्वेक्षण करून त्याची उत्तरे सॉफ्टवेअरमध्ये भरायची आहेत. तलाठी, पोलिस पाटील, कोतवाल यांचे सहकार्य व गरज पडल्यास पोलिस आयुक्त पोलिस अधीक्षकांना आवश्यक बंदोबस्त पुरविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मराठवाड्यात २५० कोटींचा महाघोटाळा

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

छत्रपती संभाजीनगरमध्ये केंद्रीय जीएसटी पथकाने मोठी कारवाई केली. २०० कंत्राटदारांनी मिळून जवळपास ४० ते ५० कोटींचा कर चुकवला असल्याची माहिती समोर आली आहे. बोगस कंपन्यांच्या बिलांद्वारे हा घोटाळा करण्यात आला आहे. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे. एक बोगस कंपनी आहे. जिचा वापर कर चुकवण्यासाठी करण्यात आला होता. जीएसटी विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २०० ते २५० कोटी रुपयांची बोगस बिले घेतली. सिमेंट विक्रीच्या ९ कंपन्या स्थापन केल्या. जवळपास २०० गुत्तेदारांनी या कंपनीची बिले घेतली. कागदावर असलेल्या कंपनीचा मालक असलेल्या कादरला अटक करण्यात आली आहे. त्याच्या बोगस कंपन्यातून कंत्राटदारांनी बिले दाखवली आहेत. केंद्रीय जीएसटी पथकाने २०० ते २५० कोटी रुपयांचा बोगस बिलांचा घोटाळा समोर आणला आहे. जालना जिल्ह्यात सिमेंट विक्रीच्या ८ ते ९ बोगस कंपन्या स्थापन करण्यात आल्यात. या घोटाळ्यातून ४० ते ५० कोटींचा जीएसटी बुडवण्यात आल्याचा ठपका आहे. बिले घेणाऱ्या कंत्राटदारांचा शोध सुरू आहे. या घोटाळ्यात काही सीए यांचा हात असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या घोटाळ्यात मराठवाड्यातील लातूर, धाराशीव वगळता ६ जिल्ह्यातील २०० कंत्राटदारांचा या घोटाळ्यात समावेश आहे. जाफर कादर ही व्यक्ती त्याच्या नावे ८-९ कंपन्या असून त्यातील एकही कंपनी अस्तित्वात नाही. बिले घेणाऱ्या कंत्राटदारांकडे रस्ते बांधकाम, पाणी पुरवाठ्याशी संबंधित बांधकाम आदी प्रकारच्या कामांची कंत्राटे होती. त्यामुळे या कंत्राटदारांनी किती दर्जेदार कामे केली आहेत, याबद्दल ही चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, याआधीदेखील राज्यात जीएसटी घोटाळा उघडकीस आला होता. सांगली जिल्ह्यात यापूर्वी विजयनगर येथे गुजरातमधील व्यापाऱ्याने खोबरं विक्री दाखवून विभगाला चार कोटी रुपयांचा चुना लावला होता. तसेच दुसऱ्या एका प्रकारात जतमध्येही एका शेतमजुराच्या आधार, पॅनचा वापर करुन कोट्यवधींची बोगस विक्री दाखवत जीएसटी चोरी केली होती. नाशिकमध्ये भंगार व्यापाऱ्यांचा १०० कोटींचा जीएसटी घोटाळा झाला असल्याची माहिती मिळत आहे. बनावट कागदपत्रांद्वारे इनपुट टॅक्स क्रेडिट मिळवत फसवणूक झाल्याची माहिती समोर आली होती.

बीड विशेष
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
दैनिक
| बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर
मराठवाडा पत्र
शनिवार,दि. ६ जानेवारी २०२४ • पान 4

महत्त्वाचे वृत्त..

धार्मिक कार्यक्रमाहून परतणाऱ्या तरूणाचा धडकेत जागीच ठार

कडा- टाकळी अमिया येथील धार्मिक कार्यक्रमासाठी गुरूवारी रात्री आईला सोडून घराकडे दुचाकीवरून परणाऱ्या मुलाचा रात्री साडेनऊच्या दरम्यान अज्ञातवाहनाच्या धडकेत मृत्यू झाला. महेश नागेश होळकर (१८) असे मृत तरूणाचे नाव आहे. आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथे काही दिवसांपासून संत बाळुदेव महाराजाच्या मेंढ्या आल्याने तिथे धार्मिक कार्यक्रम सुरू आहे. गुरूवारी रात्री या कार्यक्रमासाठी महेश होळकर हा आईला घेऊन गेला होता. आईला तिथे सोडून महेश दुचाकीवरून (ा.ह.१४ ऋण ५१०१) घराकडे निघाला. रात्री साडेनऊ वाजेच्या दरम्यान टाकळी अमिया रोडवर अज्ञात वाहनाने दुचाकीला जोराची धडक दिल्याने महेशचा जागीच मृत्यू झाला.

विविध पुरस्कारांचे होणार वितरण

माजलगाव : माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिनानिमीत्त देण्यात येणारे विविध पुरस्काराचे वितरण आमदार प्रकाश सोळंके व मान्यवरांच्या उपस्थितीत रविवारी ७ जानेवारीला वैष्णवी मंगल कार्यालयात करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर यांनी दिली आहे. मराठी पत्रकारीतीचे जनक कै. बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनानिमीत्त माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळा वैष्णवी मंगल कार्यालयात दि.७ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११. वा. आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी जेष्ठ पत्रकार तथा पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर हे तर आमदार सोळंके यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहेत तर माजी आमदार सोळंके, माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, माजी आमदार देशमुख, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, भाजपाचे नेते रमेशराव आडसकर, छत्रपती कारखान्याचे व्हा. चेअरमन जगताप, तहसिलदार मनाळे, विशेष उपस्थिती असणार आहे. यावेळी दर्पण पुरस्कार अमरनाथ खुर्पे यांना तर माजलगाव चे भूषण असणारे माजी शिक्षक आमदार देशमुख यांना मराठवाडा भूषण तसेच यशस्वी उद्योग भूषण पुरस्कार गोपाळ, गोविंद गरड यांना प्रदान करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले,सचिव दिनकर शिंदे, कार्याध्यक्ष कमलेश जाब्रस, उपाध्यक्ष येवले,जेष्ठ पत्रकार मुळी,पत्रकार महेंद्र मस्के, पत्रकार अरविंद ओव्हाळ यांनी केले आहे.

बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्ज ; गुन्हा दाखल

बीड : कर्जाचा प्रस्ताव दाखल करून महामंडळाच्या अटीनुसार दोन जामीनदार देऊन तब्बल ७५ हजार रुपयांचे कर्ज उचलले. मात्र फेडीदरम्यान कर्जदाराकडून चालढकल होऊ लागल्याने ओबीसी महामंडळाने जामीनदाराकडे वसुलीचा तगादा लावला असता बीडच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागात असलेल्या जामीनदारांनी महामंडळाकडे जामीनदार म्हणून दिलेले सरकारी नोकरदार आपल्याकडे नोकरीच करत नसल्याचे लेखी कळवले. त्यामुळे महामंडळाच्या सुमारे १ लाख ९ हजार ३१४ रुपयांचा अपहार झाल्याचे उघडकीस आल्यानंतर महामंडळाचे व्यवस्थापक यांच्या फिर्यादीवरून लोहार गल्लीतील सचीन चोथे सह जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागात कार्यरत असलेले अनिल काळे व विजय गायकवाड यांच्या विरोधात कलम ४२० नुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीडच्या लोहार गल्लीतील सचिव रामदास चोधे यांनी २००९ मध्ये दुग्ध व्यवसाय करण्यासाठी ओबीसी महामंडळाकडे ७५ हजार रूपये कर्जाची मागणी केली. ▶▶ पान २ वर

स्वरांजली
संगीत अॅकॅडमी
गायन, हार्मोनियम, तबला, ढोलकी, मृदंग, बँजो, शास्त्रीय पध्दतीने शिकवले जाईल.
राहूल डी.गवळी
कवी गायक संगीतकार
भगवान बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर लिखीत स्वतंत्र चालीमध्ये इणडाणीत सामाजिक प्रबोधन आणि क्रांतीकारी मनोरंजनासाठी अवश्य भेट द्या.

9763785564 / 7559126663
शिवाजीनगर, नवगण कॉलेजजवळ,पालवण रोड, बीड -४३११२२

विद्यार्थ्यास रॉडने मारहाण

बीड : शिवणी माध्यमिक विद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या एका दहावीच्या विद्यार्थ्यास चार ते पाच विद्यार्थ्यांनी रॉडने मारहाण केल्याची घटना काल घडली असून यात सदरील विद्यार्थी जखमी झाला असून त्याच्यावर बीडच्या जिल्हा रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. आदित्य सानप हा विद्यार्थी शिवणी हायस्कुलमध्ये दहावीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. काल त्याला शाळेच्या परिसरामध्ये काही विद्यार्थ्यांनी रॉडने हल्ला करून जखमी केले. सानप याच्या डोक्यावर गंभीर दुखापत ▶▶ पान २ वर

मराठा आरक्षणासाठी गंगाधर काळकुटे यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक गंगाधर काळकुटे यांनी मराठा आरक्षण प्रश्न लक्षात घेऊन स्वतःच्या वाढदिवसानिमित्त केले एक दिवशी लाक्षणिक उपोषण. त्यांनी वाढदिवसाच्या दिवशी कुठलाही हारतुरा शाल सत्कार स्वीकारला नाही. त्यांनी एक लक्षवेधी आगळे वेगळे मराठा आरक्षण मिळावे यासाठी आंदोलन केले आहे. मनोज जरांगे पाटील आणि मराठा समाजाने हाती घेतलेला मराठा आरक्षणाचा लढा अंतिम टप्प्यात आहे

तसेच यासाठी माझ्या शेकडो बांधवांनी आपले जीव गमावले आहेत. बलिदान दिले आहेत, मराठा समाजातील अनेक जणांचे घरं रस्त्यावर आले असून एकीकडे आरक्षणाची अपेक्षा तर दुसरीकडे बांधवांनी आत्महत्या केल्याचे दुःख आहे. अशा वातावरणात दि.०५ जानेवारी रोजी असलेला वाढदिवस साजरा करणे मनाला पटत नाही. यामुळे यावेळी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. समाज उपयोगी उपक्रम घेतले तर, हरकत नसावी आणि मी सत्कार घेणार नाही तसेही मी आरक्षण लढा सुरू झाल्यापासून सत्कार घेत नाही पण वाढदिवसाच्या निमित्ताने सहाकरी आग्रह करतात म्हणून हे नमूद केले आहे आणि केक पण कापणार नाही. तसेच आज सकाळी १० वाजल्यापासून जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे मराठा आरक्षण मिळण्यासाठी वाढदिवसाच्या निमित्ताने एक दिवशीय लाक्षणिक उपोषण केले आहे . गंगाधर काळकटे पाटील यांच्या उपोषण स्थळाला सकाळपासूनच अनेक मान्यवरासह मराठा बांधवांनी भेट देऊन पाठिंबा दर्शवला आहे. या अनोख्या मराठा आरक्षण आंदोलनाची चर्चा संपूर्ण जिल्हाभर व महाराष्ट्रभर होत आहे..

बीड : शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख पोतदार यांच्या हस्ते प्रकाशन यावेळी श्री जगदंबा अर्बनचे संस्थापक तथा शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे, नगरपरिषद चे माजी सभापती नवनाथ शिराळे, उपजिल्हाप्रमुख सुशील पिंगळे,जिल्हा सहसंघटक गुजर, दै.मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे,गव्हाणे सर, दत्तात्रय रोहीटे,शिवाजी वामणे, शिंदे, शेळके, शेरकर यांच्या सह आमचे सभासद कर्मचारी ग्राहक उपस्थित होते.

मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दर्पण दिनाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने बीड शहरातील सीएससी अकॅडमी, शाहूनगर, हनुमान मंदिर रोड ,जाधव हॉस्पिटल समोर दर्पण दिन तसेच 'आयुष्यमान भारत आरोग्य कार्डचे' वितरण करण्यात येणार आहे.कार्ड साठी घाडगे सर मोफत सहकार्य करणार आहेत. हा कार्यक्रम सकाळी १० वाजता होईल मराठी पत्रकार परिषदेच्या बीड शहर आणि तालुक्यातील सर्व सदस्यांनी या कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे यांनी केले आहे. दरवर्षीप्रमाणे देशातील पहिले मराठी दैनिक 'दर्पण' हे बाळशास्त्री जांभेकर यांचे पहिले वृत्तपत्र सुरू झाले. त्यानिमित्ताने दरवर्षी ६ जानेवारी रोजी दर्पण दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते .मराठी पत्रकार परिषदेच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने बीड शहरातील शाहूनगर भागातील 'सीएससी अकॅडमी' या ठिकाणी दर्पण दिन व याच ठिकाणी आयुष्यमान भारत कार्डची प्रक्रिया तसेच कार्डचे वितरण केले जाणार आहे . सदस्यांनी आपल्या सोबत आपले आधार कार्ड वर रेशन कार्ड घेऊन यावे .या कार्यक्रमाला बीड तालुका आणि शहरातील मराठी पत्रकार परिषदेच्या सर्व सदस्यांनी आणि हितचिंतकांनी उपस्थित रहावे असे आवाहन ▶▶ पान २ वर

मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची ६० टक्के रक्कम महाविद्यालयास जमा करण्याचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

केंद्र शासनाने अनुसूचित. जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकौत्तर शिष्यवृत्ती योजना लागू केलेली आहे. सदर योजनेअंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १७ मार्च २०२२ व दिनांक ६ जुलै २०२३ शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे अनु. जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाचे ६० टक्के हिश्याची रक्कम महाडीबीटी प्रणालीद्वारे अनुसूचित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा झाल्यानुसार विद्यार्थ्यांनी त्यांना अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्त्याची रक्कम वजा करून उर्वरित शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर ना परतावा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालयास ७ दिवसाच्या आत जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. गेल्या काही दिवसापासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची वर्ष २०२१-२२ व वर्ष २०२२-२३ या वर्षातील ६० टक्के रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे. करिता ज्या विद्यार्थ्यांच्या खात्यात अशी रक्कम जमा झालेली आहे किंवा जमा होणार आहे. अशा विद्यार्थ्यांनी त्या रकमेमधून निर्वाह भत्त्याची रक्कम वजा करून उर्वरित सर्व रक्कम महाविद्यालयास जमा करावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातर्फे करण्यात आले आहे. याप्रमाणे कार्यवाही न केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

ग्रामीण जीवन विमा योजना, वारसांना मदतीचे वाटप

बीड । प्रतिनिधी

ब्रम्हनाथ येळंब ता. शिरूर येथील रहिवाशी काशीद सुरेश नामदेव यांचा दि. ३ मे २०२१ रोजी अचानक नैसर्गिक मृत्यू झाला होता. त्यांनी पोस्टाचा ग्रामीण टपाल जीवन विमा दि. १५ सप्टेंबर २००८ रोजी घेतला होता. त्यांच्या पश्चात वारसदार म्हणून त्यांची पत्नी श्रीमती कांताबाई सुरेश काशीद यांना टपाल जीवन विमा योजनेतून रुपये १ लाख ७३ हजार ५१७ रुपयाचे धनादेश डाक अधीक्षक डी. आर. शिवणीकर, अधीक्षक डाकघर, बीड विभाग यांच्या हस्ते हेड पोस्ट ऑफिस येथे १ जानेवारी २०२४ रोजी वाटप करण्यात आला. डाक जीवन विमा व ग्रामीण डाक जीवन विमा योजना कर्मचारी व शेतकऱ्यांच्या हितासाठी चांगली आहे. या योजनेत हप्ता कमी व लाभ जास्त मिळतो. ग्रामीण भागातील व्यापारी, शेतकरी यांना १० लाखाचा तर सरकारी, कर्मचारी, डॉक्टर, इंजिनिअर, एन सी ई, बी सी ई यांचे कर्मचारी यांना देखील ५० लाखापर्यंतचा विमा घेता येतो. तरी सर्वांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डाकघर, बीड विभाग, डी आर शिवणीकर यांनी केले आहे. यावेळी पोस्टमास्टर, बीड एच. एस. पानखडे, विकास अधिकारी बी.एस. मोरे व पोस्टाचे इतर कर्मचारी उपस्थित होते.

जात प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव दाखल करण्यासाठी विशेष मोहिम

बीड । प्रतिनिधी

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड कार्यालयात वर्ष २०२३-२४ या वर्षात जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड तर्फे अनुसुचित. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विज्ञान शाखेच्या इयत्ता ११ वी १२ वी मध्ये शिकत असलेल्या व व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणा या विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी समितीकडे विहित कालमर्यादेत अर्ज करणे आवश्यक आहे. या समितीने माहे एप्रिल २०२३ ते डिसेंबर २०२३ अखेर १३८०६ प्रकरणे निकाली काढलेली आहेत. अर्जदारांचे या समितीकडे २६२ जात प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव त्रुटी पुर्ततेविना प्रलंबित आहेत. अर्जदारांना नोंदणी केलेल्या भ्रमणध्वनीवर लघु संदेश आणि नोंदणी केलेल्या ई-मेलद्वारे त्रुटी सुध्दा कळविण्यात आल्या आहेत. तसेच कार्यालयातील दुरध्वनीवरुन अर्जदारास प्रत्यक्ष संपर्क करुन त्रुटी कळविण्यात आलेल्या आहेत. प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी अद्यापपर्यंत त्रुटीची पूर्तता केलेली नाही अशा अर्जदारांनी कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे. अर्जदारांकडून त्रुटी पूर्तता/कागदपत्रांची पूर्तता न केल्यास त्यांच्या प्रकरणांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. त्रुटी पुर्ततेअभावी आपला जातीदावा समितीकडून फेटाळण्यात आल्यास तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी, निवडणूक, सेवेसाठी अपात्र ठरल्यास याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची ▶▶ पान २ वर

आष्टी विधानसभा अध्यक्षपदी खाडे यांची निवड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील समाजिक कार्यकर्ते राम खाडे यांची आष्टी विधानसभेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने त्यांच्याकडे मोठी जबाबदारी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या मान्यतेने राम खाडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आष्टी विधानसभा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. खा. शरदचंद्र पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या विकासात आपण भरीव कार्य करुन पक्ष संघटना मजबुतीने उभी कराल अशी अपेक्षा व्यक्त करत प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांनी निवड जाहीर केली. पक्षाने दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघात पक्ष वाढीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करु असे राम खाडे यांनी सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल आ. संदिप क्षिरसागरांनी शुभेच्छा दिल्या.

अनिल जगताप करणार पक्ष प्रवेश

बीड । प्रतिनिधी

गेल्या तीस चाळीस वर्षांपासून एकनिष्ठेने शिवसेनेची धुरा खांद्यावर घेऊन काम करणारे बीडचे माजी जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी उबाठा गटाला जय महाराष्ट्र केला आहे.पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली.९ जानेवारी रोजी आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश करणार आहोत असे त्यांनी जाहीर केले. बीड जिल्ह्यात विद्यार्थी दशेपासून शिवसेनेचे काम करत असलेले अनिल जगताप यांच्यावर १३ वर्ष जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी होती.मात्र अचानक त्यांच्याकडील जबाबदारी इतरांवर देण्यात आली.परंतु पुन्हा त्यांना ही संधी पक्षाने दिली. बीड जिल्ह्यात वाडी वस्ती तांड्यावर शिवसेना आणि शिवसेनाप्रमुख यांचे विचार पोहचवण्याचे काम जगताप यांनी केले.मात्र काही दिवसांपूर्वी उबाठा गटाने जगताप यांना सहसंपर्क प्रमुख पदाची जबाबदारी देत नव्या पदाधिकाऱ्यांची निवड केली. तेव्हापासून जगताप हर नाराज होते.त्यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका जाहीर केली.ते ▶▶ पान २ वर

वाळू उपशावर महसूलची कारवाई ; ४० ब्रास वाळू साठा केला जप्त

माजलगाव । प्रतिनधी

सध्या महसूल आणि पोलिस प्रशासन हे निवडणुकांची विविध कामे तसेच मराठा आरक्षण प्रश्नावर चाललेल्या गुंत्यात अडकलेले असल्याचे पाहून गोदापात्रा शेजारील गावांमध्ये वाळू माफियांनी वाळू उपशाचा धडाका लावला होता. परंतु येथील तहसीलदार वर्षा मनाळे आणि पोलिस प्रशासनाने कारवाई करत रिधोरी परिसरातून वाळू चोरी करणारे हायवा जेसीबी केणी इत्यादीसह चाळीस ब्रास वाळू साठा जप्त केला आहे. वारंवार अवैध वाळू उपशासंदर्भात तक्रारी वाढू लागल्याने प्रशासनाने गंभीर भूमिका घेत अचानक रिधोरी परिसरात होत असलेल्या वाळू चोरीच्या ठिकाणी छापा टाकला. या ठिकाणी केणीद्वारे वाळू उपसा केला जात होता सदरील ठिकाणाहून हायवा दोन जेसीबी केणी इत्यादी वाळू चोरीचे साहित्य जप्त करण्यात आले. तर नदीपात्राशेजारी असलेली वाळू ही परत नदीपात्रात

(प्रतिकात्मक)

ढकलून देण्यात आली. चिखल असल्यामुळे ही वाळू जप्त करता आली नाही. नदीपात्राचे बाजूस असलेली सुमारे ४० ब्रास वाळू जप्त करण्यात आली असून ही वाळू शेलगाव थडी बंधाऱ्या लगत साठा करून ठेवण्यात आली होती. वाळू जप्त केल्यानंतर ती येथील विश्रामगृह परिसरात आणून टाकण्यात आली आहे. याप्रकरणी फौजदारी स्वरूपाची तसेच दंडात्मक कार्यवाही संबंधीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती तहसीलदार वर्षा मनाळे यांनी दिली.

कथा प्रबोधनाची चळवळ -माजी आ.देशमुख

माजलगाव । वृत्तसंस्था

माणूस म्हणून कसे जगावे याचे मूल्यसंस्कार मुलांवर रुजवणारी सानेगुरुजी कथामाला ही प्रबोधनाची चळवळ आहे,असे प्रतिपादन नवविकास मंडळाचे कार्यवाह तथा माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांनी केले. साने गुरुजी कथामाला शाखा महात्मा फुले विद्यालयाच्या वतीने आयोजित ३०व्या तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धेच्या उदघाटन कार्यक्रमात श्री.देशमुख बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवविकास मंडळाचे अध्यक्ष एस. आर. शर्मा,सहकार्यवाह आर.बी.देशमुख, संचालक डॉ.सचिन देशमुख,संस्थेच्या सदस्या सुलभा देशमुख,कथामालेचे कोषाध्यक्ष के.व्ही.गाजरे, मुअ. के.एल.मोताळे, मुअ. सुनीता धसकटे,पर्यवेक्षक एम.एन.मसलेकर,कथामालेचे शाखा अध्यक्ष ग.वा. मुळाटे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी आमदार डी. के. देशमुख म्हणाले की, मागील ३० वर्षांपासून सुरू असणारा कथामालेचा सातत्यपूर्ण उपक्रम वाखाणण्याजोगा असून ▶▶ पान २ वर